Vol 5 Issue 11 Dec 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

ISRJ Indian Streams Research Journal

# शाहीरी कवीच्या लावणीतील शृंगारीकता

प्रा. बबन सिद्राम गायकवाड
मराठी विभाग, सांगोला महाविद्यालय, सांगोला.
ता. सांगोला, जि. सोलापूर.

**प्रस्तावना :—**

संताच्या आणि पंडितांच्या कवितेपेक्षा अगदी वेगळी कविता अठराव्या शतकात लिहिली गेली. तिलाच शाहिरी काव्य किंवा कविता असे म्हटले गेले. राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजीबाळा, परशराम या शाहीरांच्या लेखणीतुन आणि वाणितून निघालेले हे काव्य आणि डफ — तुणतुण्याची साथ घेऊन लोकांचे रंजन करू लागले. या कवितेचे विषय आणि प्रेरणा संत — पंताचे वेगळे होते. संत आणि पंत यांच्यापेक्षा शाहीर लोकजीवनात पूर्णपणे समरसून गेले. अध्यात्मिक स्पर्श असला तरी तो स्थायीभाव नव्हता, लोकजीवनातील विविध प्रसंग जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीरपुरूष आणि रूपगुणसौदर्याने व त्यातून मोह — घालणा — या रूपयौवना यांचे प्रेमोत्कट भाव, वातावरणातील रंगेलपणा आणि रगेलपणा व त्यातून प्रत्ययाला येणारे असंख्य प्रसंग या साऱ्यांच्या प्रसंगातून, संस्कारांतून शाहिरांची कविता जन्माला आली. लोकांची भावना लोकांच्या शब्दात लोकांसाठी मांडणारे शाहीर हे खरे लोककवी होते. ऐहिक जीवनाचा त्यांना अपार लोभ होता. संसाराची लालसा होती. आणि पराक्रमाची बेहोश होती. त्यामुळे समकालीन जीवनाचा प्रत्यय शाहिरी कवितेतून पुरेपुर होत नाही. असे म.ना. अदवंत म्हणतात. शाहिरी कविता म्हणजे मराठयाची खरी गाणी होत असा उल्लेख आहे. रचनेची निर्मिती केलेली आहे. त्यापैकी लावणीतील स्त्रीशृंगाराची रूपे या अनुषंगाने आपल्याला प्रस्तुत विचार करावयाचा आहे.




शाहिरांच्या काव्याला खरा बहर आला तो वीर रसाला मागे टाकून वीरसाच्या जोडीला शृंगार आला तेंव्हा शाहीरीत वीरसापेक्षा शृंगाराने आघाडी घेतली. त्या काळातील सुखासीन आणि विलासी वृत्तीतून लावणीची लकेर बाहेर पडू लागली. आणि त्यातील शृंगाराने सर्व काव्य व्यापून टाकले. अनेक ठिकाणी त्याचा अतिरेक झाला व सदअभिरूचीच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या. व लावणी वाङःमयसंबंधी प्रतिष्ठित आणि शिष्ट लोकांत एक प्रकारचा गैरसमज निर्माण झाला. लावली वाङःमयातील शृंगारसाचे रूवरूप पंडित — कवीच्या काव्यात येणाऱ्या शृंगाररसापेक्षा वेगळे आहे. पंडितांचा शृंगार हा संस्कृतमधील शृंगारासारखा सांकेतीक आहे. स्त्री सौंदर्याची कल्पना प्रचूर वर्णने व विरवहवर्णने — विरहवर्णनातील तपशीलावर भर असे परंपरागत स्वरूप शृंगारसाला प्राप्त झाले होते. मानवी मनाची सुक्ष्म कोडी उलगडण्याचा प्रयत्न नव्हता किंवा भावनेची उत्कठता दाखविण्याचाही प्रयत्न नव्हता, तर ज्यांचा शृंगार दाखविला त्या व्यक्ती वरच्या पातळीवरील होत्या. शाहिरी काव्याचे लौकिक जीवनातील सामान्य व्यक्तींचा शृंगार वर्णन करून काव्य विषय आपल्या अगदी जवळ आणला आणि शृंगाररसाच्या वर्णनात पूर्वीचे सर्व संकेत झुगारून देऊन स्वतंत्र व निराळी अशी अविष्काराची पध्दती अवलंबली.स्त्री— पुरूषाच्या प्रेमभावनांचे अनेक सुक्ष्म बारकावे त्यांनी काव्यात रंगविली गेली.

प्रेमभावनांची अभिव्यक्ती सरळ व उत्कट शब्दांत होऊ लागली. वर्णनात भावनेच्या उत्कठतेवर भर पडू लागला. मीलनाची अधिरता, पती विरहाची तळमळ / हुरहुर, प्रेमळ रूसवा, पतीच्या आगमानाची चाहुल लागताच होणारी तारांबळ, आनंद, पती मोहिमेवर निघताच होणारा वियोग / दुःख अशा कितीतरी सुक्ष्म भावछटा शाहिरांनी काव्यात रचलेल्या आहेत. त्यामुळेच शृंगारसाच्या अविष्कारात विविधता व जिंवतपणा आलेला आहे.

शृंगाराच्या दोन प्रकारापैकी संभोग शृंगार रंगविताना अनेक शाहिरांचा तोल सुटला आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यासंबंधी गैरसमज निर्माण झाले. मीलनाची वर्णने करतात काही वेळा शाहिरांकडून वर्णनाचा अतिरेक होतो. उत्तान आणि भडक अशी वर्णने येतात. नको ते शब्द अनेकदा लावण्यातून येतात. स्त्रीने कामातूर होऊन स्वतःच्या कामभावनेचे रसभरित वर्णन करून पतीला उत्तेजीत करावा किंवा कामातूर

पतीच्या विलासाचे व अतिरेकाराचे भडक वर्णन करावे असे सदाभिरूचीची मर्यादा ओलांडणारे अनेक प्रसंग शाहिरांच्या लेखणीतून दिसतात. हा विलास फक्त पती – पत्नीचाच असतो असे नाहीतर अनेकवेळा अनैतिक प्रकाराची उल्लेख येतो. त्यामुळे विलासाची ही नागडी – उघडी वर्णने बिभत्स वाटतात. त्यामुळे शाहिरांना आपला संयम राखता आला नाही असे नाईलाजे म्हणावेसे वाटते. पण हाही दोष त्यांचा नाही ते ज्या काळात वावरत होते त्या काळाचा तो दोष आहे. पण सुदैवाने अशा वर्णनातही काही ठिकाणी सुंदर काव्य आढळते. काही ठिकाणी कल्पनाविलासाने व भावोत्कठतेने हा अतिरेक भरून काढला गेला. विशेषता शृंगाररसाला उठाव देणारी सुंदर वर्णने अनेक ठिकाणी विखुरलेली आहेत. रंगमहालाचे किंवा उद्यानाचे वर्णन करताना शाहिरांची प्रतिमा विशेष फुलते. प्रभाकरांच्या लावणीतील हे वर्णन पहा,

''बहार हा झाला रात्री मोतीया फुलला, द्राक्षीचे मंडप बाई छाया अतिदाट ग!

पाचव्या मजल्यावरती सफेतीची थाट गं ! पडदी चिकाचे भंवते मधी चोरवाट ग! कांचेंची कारंजी कंदील शोभती! घोस फुलांचे वरूनि सुगंधीत लोंबती! खुशालीत मजला स्वामी घेऊन बैसती! तेंव्हा असे वांटे अधि म्यां इश्वर पुजिला! झुळझुळ वारा वाहतो चांदणे थंड ग! लावुनि रूपेरी हलके हिंदोळे बांधले! खांब सुरूचे नकासून साधले! त–हत–हेचे रंग छतापती दींधले! इंद्रभुवन भासे पाहूनिया मजला!! (10)

शृंगाररसाला उठाव आणणारी अशी काव्य वर्णने अनेक कवणातून आढळतात कधी कधी प्रियतमने पिवळा साज केलेला असेलतर कधी कधी हिरवा साज केलेला असेल त्या शृंगाराचीही वर्णन मोठी काव्यमय आहेत. शृंगाररसाच्या या प्रकारात प्रेमळ रूसव्यांचीही वर्णने अनेक ठिकाणी सापडतात. त्यातील भावनांची कोमलता मोठी मोहक आहे. अशी चित्रे अनेक ठिकाणी रंगविलेली आहेत. तर काही ठिकाणी सजणी रूसली आहे व सजण तिची समजूत काढत आहे. हा प्रेमळ रूसवा शृंगाररसाला पोषकच आहे लोकजीवनातील विविधता लावणीत एकवटली आहे. या विविधतेमागे अभंग असे मराठमोळे मन उभे आहे.

कृष्ण आणि गोपीवरही शाहिरांना पेहेराव, भाषा आणि जीवनविषयक कल्पनांचा अस्सल मराठी साज चढविला आहे. लावण्यातील नावेही साळू,मैना,चिमणी,अशी आहेत. मराठी संस्कृतीचे हे सारे दर्शन अस्सल स्वरूपाचे आहे.

अनंतफंदीची चंद्रावळ लावणी बरीच लोकप्रिय होती . फंदीच्या काळातील स्त्री सौदर्य विषयक दृष्टी काय होती, याची कल्पना या लावणीवरून येते. कृष्णाने राहीचे रूप घेतल्यावर जे अलंकार घातले त्याचे तपशीलवार वर्णन करून वेलबाळया, पानबाळया, भिकबाळया, मासवाळया अशा बत्तीस बाळयांचे उल्लेख आहेत. त्यावरून तत्कालीन समृध्दी प्रकट होते. शृंगारवर्णनात मात्र कवीचा तोल सुटला आहे. कृष्णजीवनाधारे शाहीर श्रोत्यांच्या शृंगाराची भूक कशी भागवीत याचा एक उत्कृष्ठ नमूना म्हणजे ही लावणी होय. चंद्रावळ लावणीत कथा पण बाहयता रूप मात्र माणसाचे आहे. फंदीची त्रिस्तनीची लावणीही बरीचशी किळसवाणीच आहे. अक्रूरावरील लावणीतून कृष्णांवरील गोपींच्या प्रेमाचे दर्शन घडविलेले दिसून येते. एका लावणीत तर त्यांनी संध्येतील भगवतांची चोवीस नावे एकत्र गुंफुन दाखविलेली आहेत. ' तर धन्य तुझे लावण्य ' या लावणीतील नायिकेच्या पायातील जोडव्याचे वर्णन करताना ते म्हणतात माडया गुढघ्या सरळ पोटऱ्या पायी जोडवी खणाणी जसे घोडयाचे नाल वाजती आवाज कानी दणाणी. (270)

आजवर मनात भरणाऱ्या रतिरूप सुंदरीची वर्णन अनेक शाहीरांनी केली पण '' नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी. । उमदा कोणी उमराव दिसे सरदार सौभाग्य घरी, ''। हे शाहीर परशरामाने केलेले मदानी सौंदर्याचे वर्णन लक्षात रहाण्यासारखे आहे. किंवा 'सांड गावामधी फिरतो भांड रिकाम टेकडा ' असे आपल्या ऐतखाऊ नादान नवऱ्याचे चित्र रेखाटणारी स्त्री यात दिसते.तर कधी ' निर्मळ मुखडा चंद्राकार । सरळ नाकाची शोभते धार.' किंवा गगनात चांदणी ठळक मारिशी झळक उभी ग अंगणी । किती नटून थटून मारशिल छनाछन नयनाच्या संगिणी'। निपुत्रिका , गरोदर लेकुरवाळया अशा स्त्रियांचेही मनोभाव परशरामाने काही लावण्यातून टिपलेले आहेत. (273) तर प्रखर विद्वतेची परंपरा असलेल्या घराण्यात न रमता व्युत्पन्नता आणि कवित्व याचा सुंदर समन्वय घडवून व्यक्तीमत्त्वाचा ठसा शाहिरी काव्यात उठविणारा व पंडित कवी आणि शाहीर कवी या दोन परंपराचा दुवा जोडणारा कवी म्हणून ज्यांचा नावलौकिक आहे. त्यांनी आपल्या लावण्यांत स्त्रीच्या यौवनाची, प्रियकरासाठी होणाऱ्या तळमळीची वर्णने चित्रीत केलेली असली तरी ती सर्व प्रस्तापित नीतीच्या चौकटीत मर्यादीत ठेवलेली आहेत. सुंदरा मनामध्ये भरली, ही रामजोशीची प्रसिध्द आणि रसिक प्रिय लावणी स्त्री सौंदर्याच्या मोहक आणि उन्मादक वर्णनाचा सुंदर नमुना आहे.

'सुंदर मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलीत शिरली मोत्याचा भांग, 'किंवा' अंगि तारूण्याचा बहर ज्वानिचा कहर मदन तलवार' अशा प्रायत्मकतेने या लावणीच्या सौंदर्यात भर घातली आहे. संस्कृतातील संकेताचे अनुकरण करून मराठमोळया स्त्रीचे सौंदर्य व तिचा साजशृंगार रामजोशीनी मोठया ढंगदारपणे व्यक्त केला आहे. 'कुण्या ग सुमगाची तु मंजिरी ही लावणी अशीच आहे. शृंगाराला भरपूर अवसर असणाऱ्या कृष्णलिलावर्णनर लावण्यातही रामजोशीनी सद्भिरूचीची बंधने सोडलेली नाहीत. त्यात शृंगार आहे पण तो विप्रलंभ आहे. त्यांचे संभोग शृंगारात पर्यवसान होत नाही. राधा – कृष्ण यांच्या होरीच्या प्रसंगीच्या कीडेचे वर्णनही त्यांनी अत्यंत बहारीने केले आहे. राधेने कृष्णाचे व कृष्णाने राधेचे रूप घेतल्यामुळे जो संभ्रम निर्माण झाला त्यामुळे साऱ्या प्रसंगात काही औरच रंग भरलेला आहे. नर्म आणि सूचक शृंगारामुळे रामजोशीनी लावणी कायम स्मरणात राहाते. लौकिक विषयावरील अनेक लावण्यांत रामजोशीनी स्त्रीमनाचे विविध रंग चितारले आहेत. झाली तरूणपणाची धुळ पति नाही सेजेवरी सुंदरा रडे मुळमुळ.। अशी विरहव्याप्त नाचिका एका लावणीत आढळते. तर दुसरीत तुम्ही सजणा – सुजणा घ्या आदराचे पान.। मज दुबळीचा राखा स्वाभिमान। अशी पतीची विनवणी करणारी पतिव्रता आढळते. तर दुसऱ्या बाजीरावाच्या काळात लावण्यात शृंगाराच्या वेगवेगळया छटा दाखविणारे शाहिर प्रभाकर यांनी लावणीतील शृंगारवर्णनात नैतिकतेचे बंधन न राखल्याने हा शृंगार उद्दाम झालेला दिसतो. कामवासनेच्या भडक चित्रांचे वर्णन त्यातून घडते. पण काही लावण्यातून त्यांची सुंदरतही दिसते. मोहिनी जसी सुरसभेमची अमृत वाढीकरी। तशी नार पंगतित आगृह करी.। खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचे व रूबाबाचे डौलदार वर्णन उल्लेखनीय आहे. निवडक शब्दांच्या सुंदर योजनेतून स्त्री सौदर्याचे सुंदर वर्णन 'डुलते डुलते चाले झुलत बोलता हले हलकडी' या लावणीत आढळते.कधी प्राण सखे भेटती. या विरहाने तळमळणारी आणि नका जाऊ दूर देशी घरी काय धन द्रव्याला कमी. आली हो वर्षाची नागपंचमी' असा पतीला घरी राहण्याचा आग्रह धरणारी पत्नी काही लावण्यात आढळते. 'सगुण गुण गंभीरा तुला कशी दुपारची रे सोसेल काहथली.' अशी एकीला चिंता

वाटते. तर दुसरी कुचाची नौबत झाली म्हणून पतीला उठवून स्वारीवर पाठविते. पतीसोबत स्वारीवर येण्याचा हट्ट धरणाऱ्या एखादया नायिकेची' परम परदेश कठीण काते. कसे ग तुज न्यावे सगुणशांते.'अशी समजूत घालण्याचा यत्न नायक करतो. निपुत्रका आणि गर्भवासिनीच्या भावना प्रभाकारच्या लावण्यातून व्यक्त झालेल्या आहेत. तत्कालीन मराठी स्त्रीच्या अंगावरील विविध दागिन्याचेही वर्णनही प्रभाकरच्या लावणीत आढळते. तर लढाईवर नवऱ्याला जाण्यास परावृत्त करणारीही लावण्यवती नायिक या ठिकाणी दिसते.

'मुळी मुलूख कर्नाटक , निर्दयी लोक कंटक ।

विश्वासघातकी ठक, बिकट झाडीच चहूकडून अशी स्त्रीरूपे प्रभाकरांच्या लावण्यातून दिसतात. तर सगनभाऊंच्या लावण्यातून नायक संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. सगन भाऊंच्या लावण्यांत शृंगाराच्या बाहयवर्णनापेक्षा मनोभावनेला अधिक प्राधान्य आहे. 'असी कि रे वाढल' या लावणीत 'आली दुनिया उफराटी फार तुम्ही साधवगिरीने असा,' हा व्यावहारिक उपदेश करणारी नायिका दिसते. इतकेच नव्हे तर 'परनारीशी भाषण करता विचार नाही बरा' असा नीतीविषयक उपदेशही सगनने तिच्या तोंडून वदविला आहे. 'चंद्राचे चांदणे शीतल का उष्ण' या लावणीत नायक नायिकेच्या सवाल जबाबातून घडणारे शृंगारदर्शन मार्मिक आहे. दौलताबादच्या साबाजी अनंताची प्रीती मिळावी म्हणून बेदरच्या कामसेनेने योजिलेल्या युक्त्यांचे वर्णनही एका लावणीत आले आहे. सवतीसवतीचे भांडण या विषयावर सगनची असून त्यातील नवरा मिस्कील आहे. 'घोर जीवाला लावून गेली परम जीवाची सखी म्हणून मुशाफर बनून तिच्या दारी जाणारा नायक किंवा मर्दानी पोशाख करून प्रियकराला भेटायला जाणारी नायिका अशी कल्पनारम्य वातावरणातील व्यक्तीचित्रे या लावण्यात आढळतात. पण इतर शाहिराच्या मानाने सगनभाऊची विद्वता कमी असलीतरी भाषेत मात्र जोम आहे. या उलट होनाजीच्या लावण्यातून प्रेम भावनेच्या विविध छटा हळूवारपणे व्यक्त झाल्या आहेत. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून निपुत्रिकेच्या करूण आर्ततेपर्यतचे कितीतरी वेगवेगळे रंग त्यात आढळतात. प्रीतीचे बाण मारून प्रवासाला निघून गेलेल्या पतीच्या विरहाने झुरणारी नवोढा, विरहावस्थेत परपुरूषाला चतुर्थीच्या चंद्राप्रमाणे वर्ज्य मानणारी एकनिष्ठ पत्नी, 'गेला जसा तसा कधी पाहीन आपला प्राणविसावा, सत्वर उठा सख्यांनो मजला पक्ष्यांचे पर लावा.' असे व्याकूळ उदगार काढणारी विरहांतरिता, अशी कितीतरी सुंदर चित्रे त्यांच्या विरहिणी गीतात सापडतात. 'तुझ्या प्रीतीचे दुःख मज दाऊ नको रे. वधून जाई जगी ठेवू नको रे.' या लावणीत प्रीतीचे सामर्थ्य व प्रीतीचा परिणाम कवी घडवितो. 'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी. झडप घालून प्राण देतो दीपकाचे वरी.' अशी प्रेमविषयक जाणीवही करून देतो. रामजोशीच्या सुंदरा मनामध्ये भरली. या लावणीप्रमाणे होनाजीची 'लटपट तुझं चालणं ग मोठया नखऱ्याचं. बोलणं ग मंजुळ मैनेचं' ही लावणी म्हणजे मराठमोळया स्त्रीच्या सौदर्याचे सुंदर वर्णन आहे. या वर्णनाला डौलदार गथीची साथ आहे. नादमय शब्दयोजना शब्दांची पुनरूक्ती आणि समर्पक उत्पेक्षा यांतून मराठमोळया सौदर्याची नखरा ढंगदारपणे साकार झाला आहे. 'सरळ चिरी कुंकवाचि कपाळी लाल जशी पिकली मिरची' किंवा 'बांधिव बुचडयाची लबक पदर अति सुरेख खोविला तिपदरी वेणीचा चंदन ढाळीत जसा लपेटा काळे नागिणीचा, 'अशा सुंदर पंक्ती सहजपणे गवसतात.' हिण माझे प्रालब्ध वांझपण कधी फिटेलबाई. एक बालक पोटीनाही 'असे निपुत्रिका ' स्त्रीचे दुःखही या लावण्यात सापडते तर एका लावणीत निपुत्रिकेला दिवस रहातात त्यावेळचा तिचा आनंद व्यक्त केला आहे. गतभर्तृकेचे दुःखही एक लावणी सांगून जाते. स्त्रीह्रदयाचे सुक्ष्म विश्लेषण हे होनाजीच्या लावण्याचे वैशिष्टय आहे.

काही लावण्यांत शृंगाराचा अतिरेक झाला असलातरी पतिव्रत्याचे आणि प्रेमाचे सामर्थ्य याचे पुरेपुर भान त्याला आहे. शरिरनिष्ठ आकर्षणाचे पर्यवसान नीतीप्रद संबधात व्हावे, अशी होनाजीची अपेक्षा आहे.

एका लावणीत साजणी सजनाची समजूत कशी करीत आहे ते पहा.

'तुम्ही सजना–सुजणाच्या आदराने पान, मज दुबळीचा राखा स्वाभिमान, तुम्ही का रुसला काय चुकले सेवेला, प्रतिपाल आजवर तुम्हि माझा कां केला नाही कधी मला शब्द दुःखाचा दिला, एकाएकी निष्ठुर का हो झालां, म्या धीरधरला कंठी प्राण उरला, हया प्रीतीचे दुःख सांगू कोणाला, तुजसाठी सख्या करीन जीवाचे रान,' यामधील भावनांची कोमलता किती रम्य आहे हे दिसते. चतुरसंवाद हाही शृंगाररसाच्या या प्रकाराला पोषक आला आहे. प्रियकर व प्रियतमा यांच्या उत्तर प्रत्युत्तरामध्ये अनेक ठिकाणी बुध्दिविलास आढळतो, पण त्याचे स्वरुप प्रेमभावनेला पोषकच आहे.

'चंद्राचे चांदणे शितल का उष्ण प्राणपती
ते सांगा मजप्रती कल्पना डोळयांमध्ये खुपत '

असा प्रश्न करणारी सगनची नायिका मोठी चतुर असली पाहिजे.

' घडी घडी अरे मनमोहना हासून गुणीजना देखता नको रे बोलू मशी,'

हे संवाद मोठे मार्मीक आहेत. शाहिरी वाडमयातील संभोगशृंगाराचे स्वरुप असे विविध आहे. त्यात अतिरेक आहे. अभिरुचीच्या मर्यादा ओलांडल्या आहेत असे वाटले तरी त्या काळाचा परिणाम म्हणून आपण सहन केला. तर त्यातील उत्कठ भावना, उत्कृष्ठ कल्पनाविलास व वातावरणाचा उठाव करणारी शृंगारसाला पोषक अशी वर्णने आपल्या मनाला मोह पाडतील.

संभोग शृंगाराकडून विप्रलभ शृंगाराकडे आपण वळलो तर मात्र शाहिरी प्रतिभेचा मोठा रम्य विलास दिसतो. वियोगाने व्याकूळ झालेल्या स्त्री–पुरुषांच्या भावनांचे वर्णन शाहिरांइतके इतर कोणी केले नसेल, व्याकुळ झालेल्या स्त्री–पुरुषांची चित्रे, यातना ते उत्कठतेने मांडतात. त्यामुळे विप्रलंभ शृंगाराचा उत्कट अविष्कार झालेला दिसतो. विरहावस्थेने पोळलेल्या या नायिकांच्या चित्रणात सुध्दा विविधता आहे. पती हौस न पुरवता प्रवासाला गेला म्हणून तक्रार न करणाऱ्या नवविवाहित तरुणीपासून ते पती वियोगाने अन्नपाण्याचा त्याग करुन झुरुन

झुरुन शरीराचे पांजर करणाऱ्या नायिकांचे चित्रणही दिसते. त्यासाठी पतीला निरोप कळवा असेही सांगते तर मोहिमेवर निघणाऱ्या पातीवियोगाने विकल झालेली नायिका दिसते. अशा अनेक छटा शाहिरांनी आपल्या कवनात रंगविल्या आहेत. प्रत्येक भावनेच्या अविष्कारांत नाविण्य आणण्याचा प्रयत्न शाहिरांनी केलेला आहे.

'नूतन वय दोघांचे सारखा जोडा गे बाई

पति प्रवास जाती हौस मनाची पुरली नाही.'असे म्हणून तक्रार करणारी नायिका आहे. ऋती आपल्या सखीला सांगते.

"कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी । दर्द जिवांतील माझा मी तरी सांगू कोणापाशी । दोन गोष्टी समजावून सख्ये सांग भ्रताराशी" येथेच ईश्वर देईल म्हणावे द्रव्याच्या राशी । नित्य उठून अंतरी प्रार्थना करिते देवासी । पती घर राहतील असा कधी पावल नवसासी । तर दुसऱ्या नायिकेची अवस्था अधिक करुणाजनक आहे. तिचाही पती प्रवासाला गेला आहे. ती म्हणते.

'पती प्रवासामध्ये सखे मि येकली मंदिरी ।

कंठु कोणाच्या वळे पाठवा पत्र तरी ' । नंतरही ती आपली आवस्था वर्णन करते. "झुरझुरून पांजर झाले शरीर निपटराहिली हाडे । राजे दिवस घोकणी पतीच्यालक्ष वाटेकडे ।। अन्नपाणी वर्जिले सखे मज नित्य उपोषण धडे ।।" पण याशिवाय सुखोपभोगाचा अतिरेकही कसा दुःसह झालेला आहे याचेही वर्णन करताना ती म्हणते.

'जागोजागी कारंजी बैठका त्या उदास दिसती । न.ये नरम मखमाली बिछाण्यावर निद्रा मजप्रती । गळा फुलाची हार सर्पासारखी भासती ।। एका नायिकेला पतिवियोग हे थोर दुःख वाटते – पण पतीवरील तिची निष्ठा कायम दिसते.

"निज पर सोडूनि सखे पारखे घरी । जावे वाटे पद ठेवणे अहिफणावरी । अन्य पुरुष चंद्रवरद चतुर्थीपरी । न पाहताजन तव्दत मनवृत्त हे सुंदरी । " यावरून नैतिक मर्यादेची व एकनिष्ठेची जाणीव दिसते.

त्याही पेक्षा परिणामकारक वर्णन आणखी एका कवनामध्ये आले आहे. विरहाते तडफडणारी ती नायिका म्हणतेः–

'हार नव्हता मंधि सहात सदन कसे सकंट वडवडले ।  
संसार भट पडो दोघांमधि आड पर्वत पडले ।।'

आणि नंतर तिला आपल्या पतीच्या सहवासात घालविलेल्या आधल्या रात्रीची स्मृती होते व जास्तच विरह व्याकूळ होते.त्याच्या प्रवासात काही संकटे आली असतील का म्हणून ती व्याकूळ व चिंताग्रस्त होते. पण एकंदरीत अशा धीरोदात्त नायिका कमीच बहुतेक विरहाने तळवळणाऱ्या व पती जवळ नाही. म्हणून झुरणाऱ्या नायिका जास्त आढळतात त्यातील काही तर

भ्रतार नव्हे हा दुश्मन पुरा  
देऊन मला विश्वास प्रवासी गेला निघून चांडाळ खरा।।'

असे म्हणण्यातही ती कमी करीत नाही, 'तुझ्या प्रीतीचे दुःख मला दावुंन नकोरे अशी प्रेमळ तक्रार त्यानी केली तर नवल नाही विप्रळभ शुगाराचे लावण्यातून व्यक्त होणारे हे स्वरूप पाहिल्यानंतर शाहिरांच्या अवलेकनाचीच व परमनप्रवेशाच्या सामर्थ्याची साक्ष आपणाला पटते. सर्व शाहिरांच्या अवलेकनाचीच व परमनप्रवेशाच्या सामर्थ्याची साक्ष आपणाला पटते. सर्व शाहिराच्या कवनांतून नायिकाच विरह विकल झालेल्या आहेत. कारण मोहिमेवर पुरूषाने जाण्याचा तो काळ होता. त्यामुळे विरह कंठण्याची वेळ नायिकेवरच येते. पंरूतु विरही नायिकांची ही वृत्ती शुध्द व सात्यिक आहे. त्या निष्ठायुक्त आहेत. अनितीच्या मार्गाने जाणाऱ्या खुप थोडया आहेत.

घरी भ्रतार आहे बिजवर। कोण सवत एक पकडली।  
ते लंपट तिजवर । कोण सवत एक पकडली।  
ते लंपट तिजवर । मी म्हणून खूप तुजवर।

अशा रीतीने जशास तसे म्हणून वाममार्गाने जाणारी किंवा संक्रातीला तिळ गूळ देण्याच्या निमित्ताने परपुरूषाला घरात बोलविणाऱ्या काही नायिका शाहिरांच्या कवणात सापडतील. म्हणून या प्रकारच्या सर्व लावण्यांतून दिसून येणारा भावनाविलास मनाची पकड घेतल्या शिवाय राहत नाही.

लावण्यातून स्त्रियांचे संपूर्ण चित्र श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या नजरेसमोर उभे करणे शाहिरांचा खास हातखंडा होता. अनंतफंदी, प्रभाकर, परशराम, रामजोशी वगैरे व इतर शाहिरांच्या काव्यात स्त्री सौदर्या वर्णनाची कलात्मकता आहे. जनानी सौदर्य हा तर लावणीचा मुख्य विषय, त्यामुळे प्रत्येक शाहिर असे वर्णन करताना दुसऱ्यांवर मात करण्याचा प्रयन्त करतो आहे असे वाटू लागते. जनानी सौदर्य वर्णन करण्याच्या भरात मर्दानी सौंदर्याकडे दुर्लक्ष झाले आहे असे नाही. त्यावेळच्या मराठा सरदाराचे मोठे रूबाबदार वर्णन अनेकांच्या कवणांतून आलेले आढळेल. शाहिरांनी वर्णन केलेल्या या सर्व स्त्रियां किंवा पुरूष मराठा आहेत. दक्षिणेकडील नोकझोक व रूबाब त्यांच्या वर्णनातून

ओसंडतो आहे. पंडित कवींच्या काळात स्त्री सौदर्यांची किंवा पुरूष सौदर्याची वर्णने नाहीत असे नाही. पण ती पारंपारिक स्वरूपाची आहेत. ठराविक उपमा उत्प्रेक्षकां साहयाने केलेली वर्णने कोणत्याही देशातील सुंदर स्त्री पुरूषाला लागू व्हावीत, शाहीरांच्या काव्यांत तसे नाही. त्यांची चंद्रावळा सुध्दा पूर्णपणे मराठमोळा झाली आहे. महाराष्ट्रीय वेशीभूषा, समजूती, मनोवृत्ती व सौंदर्य शाहिरांचे स्त्री पुरूष आपले वाटतात.

व्यक्ती वर्णनातील त्यांचे कौशल्य प्रसंग रेखाटणामध्येही आढळते. शाहिरांच्या बहुतेक लावणीत ही नाटयगीते आहेत. स्त्री पुरूषांच्या तोंडचे उदगार कवणांतून दिसतात. भाषा रसाप्रमाणे बदलते. विहहीणीचे दुःखात ती कोमल बनेल, रंगेल शृंगाराचे वर्णन करताना ती उत्तान बनेल. उपरोध प्रसंगी ती कधी धारदार बनेल. वीरप्रसंगी ती ओजस्वी असेल. शाहिरांच्या भाषेतील हा लवचिकपणा विशेष उल्लेखनीय आहे. त्याच बरोबर कल्पना परिणाम कारकपणे रंगविण्यासाठी शब्दांची मांडणी योग्य रितीने करण्यात शाहिरांना यश आलेले आहे. अर्थानुसारी नादयमय शब्दयोजना निवडण्यात त्यांचे कौशल्य दिसते.

कांहीही असलेतरी लौकिक जीवनात पूर्णतया समरसून काव्यलेखन करण्याचे श्रेय शाहिरांना आहे. लौकिक भावभावनांचे रंग घेऊन येणारा आत्माविष्कार, अस्सल त — हाटमोळेपणा, निवदेनाचा ढंगदारपणा त्यांनी मराठी कवितेला दिला. भाषेलाही काही नखरा आणि ढंग असू शकतो याची जाणीव त्यांनी करून दिली.

*संदर्भ :—*

1) पैंजण :— म.ना.अदवंत (सं) प्रकाशक
2) प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहास — साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी नागपूर संपादक ल. रा. नासिराबादकर फडके प्रकाशन.

// Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org